




# DUNIYADARI दुनियादारी

duniyadari.jalna@gmail.com



**आनंद पाणी पुरवठा**

मो.9372772766, 9422218760

रेल्वेस्टेशन रोड, जालना. फोन : 232766

घरपोच पाणीपुरवठा करण्यात येईल.

तसेच लग्न समारंभ व बांधकाम साईड येथे टँकर उभे करण्याची व्यवस्था

एक हजार लिटरचे टँकर त्वरीत मिळेल.



Vol.36, Issue No.309 Wednesday 09 September 2026, jalna | सामान्य वाचकांचे परखड दैनिक | Marathi Daily - Price - 2 Rupees, Pages- 4


## कुणबी प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सुलभ करा – न्यायमुर्ती संदीप शिंदे

छत्रपती संभाजीनगर, दि. ८(प्रतिनिधी) उपलब्ध कागदोपत्री नोंदी, वंशावळ व संबंधित पुराव्यांची नियमानुसार पडताळणी करून पात्र व्यक्तींना कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सुलभ व पारदर्शकपणे करावी, असे मार्गदर्शन न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) यांनी आज केले. कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्याबाबतच्या कार्यपद्धतीचा आढावा घेण्यासाठी न्यायमूर्ती श्री.शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृष्यप्रणालीद्वारे बैठक झाली.




विभागीय आयुक्त कार्यालयातून न्यायमूर्ती शिंदे यांनी बैठकीस मार्गदर्शन केले. यावेळी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, सह आयुक्त मंजूषा मिसकर, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते तसेच विभागातील सर्व जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे अध्यक्ष व सदस्य दूरदृष्यप्रणाली द्वारे उपस्थित **(पान-३ वर)**

## लखन तुरे हत्या प्रकरणी चारही आरोपींना अटक

### तीन लाखांच्या पैशांच्या व्यवहारातून वाद; बेदम मारहाणीत लखन तुरे यांचा मृत्यू

जालना,दि.८(प्रतिनिधी) जालना शहरातील ढवळेश्वर परिसरात पैशांच्या व्यवहारातून झालेल्या वादाला हिंसक वळण लागून लखन तुरे यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आला होता. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या लखन तुरे यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेने शहरात खळबळ उडाली होती. दरम्यान, चंदनझिरा पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत या हत्या प्रकरणातील चारही आरोपींना अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, किशोर जोगदंड, शुभम जोगदंड, राहुल कनसाळे आणि नवनाथ जोगदंड अशी



अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. लखन तुरे आणि आरोपींमध्ये सुमारे तीन लाख रुपयांच्या पैशांच्या देवाण-घेवाणीवरून वाद झाल्याची माहिती पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांनी दिली. या वादातून आरोपींनी लखन तुरे यांना मारहाण केल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले. गंभीर जखमी अवस्थेत तुरे यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला. घटनेनंतर ढवळेश्वर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. लखन तुरे यांच्या मृत्यूनंतर संतप्त नातेवाईकांनी आरोपींना तातडीने अटक करण्याच्या मागणीसाठी पोलीस अधीक्षक कार्यालयावर ठिय्या आंदोलन केले होते. दरम्यान, घटनेच्या दिवशीच राहुल कनसाळे आणि नवनाथ जोगदंड या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते. त्यानंतर आज पोलिसांनी किशोर जोगदंड आणि शुभम जोगदंड या दोघांना घाणेवाडी शिवारातून ताब्यात घेत**(पान-३ वर)**

## विश्वजीतदादा खरात यांनी घेतली जिल्हा पोलीस अधीक्षकांची सदिच्छा भेट



अंबड,दि.८(प्रतिनिधी) जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. तेगबिरसिंह संधू हे अंबड येथे आले असताना न.प.चे उपनगराध्यक्ष श्री.विश्वजीतदादा खरात यांनी त्यांची भेट घेवून आगामी गणेशोत्सव तसेच नवरात्र उत्सवासह विविध सामाजिक व सार्वजनिक प्रश्नावर चर्चा केली. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षकांनी अंबड शहरातील वाहतूक, वाढत्या चोऱ्या तसेच नगर परिषदेने नेमके पोलीसांना कोणते सहकार्य करावे यासंदर्भात उभयतांमध्ये चर्चा झाली. यावेळी अंबडचे उपविभागीय अधिकारी उपस्थित होते.

## मुक्तिसंग्राम दिन कार्यक्रमाचा विभागीय आयुक्तांकडून आढावा

छत्रपती संभाजीनगर, दि. ०८ (प्रतिनिधी) मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त १७ सप्टेंबर २०२६ रोजी सिद्धार्थ उद्यानात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण होणार आहे. या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा व नियोजनाचा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी आज आढावा घेतला. कार्यक्रम सुरळीतपणे पार पडण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी आवश्यक तयारी करून परस्पर समन्वय साधावा, असे निर्देश त्यांनी दिले. विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीत मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमाच्या नियोजनाबाबत सर्व विभागांच्या प्रमुखांशी सविस्तर चर्चा झाली. यावेळी पोलीस आयुक्त प्रवीण पवार, जिल्हाधिकारी विनय गौडा, महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, सहआयुक्त मंजुषा मिसकर यांच्यासह पोलीस, क्रीडा, शिक्षण, सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक परिवहन, विद्युत, सामाजिक वनीकरण, अग्निशमन, समाज कल्याण आदी विभागांचे**(पान-३ वर)**

## महिको कंपनी परिसरात एसटी बस पोलीसांच्या उभ्या गाडीला धडकली






बदनापूर ,दि. ८(प्रतिनिधी) बदनापूर तालुक्यातील सेलगाव जवळ महिको कंपनी परिसरात विचित्र अपघातात महिला पोलीस कर्मचाऱ्यासह अन्य तीनजण जखमी झाल्याची घटना मंगळवारी दुपारी २:३० वाजेच्या सुमारास घडली. सेलगाव जवळील महिको कंपनीजवळ जालना येथून येणाऱ्या लालपरी एस टी क्रमांक (एम एच २० जी सी ९८१२) चे ब्रेक फेल झाल्याने तेथून जात असलेली दुचाकीला धडक देऊन पुढे पोलीस उपविभागीय अधिकारी श्री. अनंत**(पान-३ वर)**

## जाफ्राबादेत धाडसी चोरी ; बारा लाखाचा मुद्देमाल लंपास

### वारंवार चर्चा होऊनही सीसीटीव्ही कॅमेरे बसवले नसल्यामुळे संताप

जाफ्राबाद,दि.८(प्रतिनिधी) घरात कोणी नसल्याची संधी साधत चोरट्यांनी सोने व इतर १२ लाख रुपयांचा ऐवज लांबविल्याची घटना शहरात उघडकीस आली आहे. शहरातील निमखेडा रोडवरील अब्दुल समद अब्दुल कय्युम कुरेशी हे काही कामानिमित्त बाहेरगावी गेलेले असताना चोरट्यांनी रात्री बाराचे दरम्यान घरातील मुख्य दरवाजांचे कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि घरातील सोन्या-चांदीच्या दागिन्यासह जवळपास १२ लाखाच्या ऐवज लांबविला. कुरेशी हे दुसऱ्या दिवशी घरी



आले असताना घरातील कपाट व इतर विखुरलेले सामान पाहून आपल्याकडे चोरी झाली हे त्यांच्या लक्षात आले त्यांनी पोलीस स्टेशनला धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळी पाहणी करून अज्ञात चोरट्याच्या नावे गुन्हा दाखल केला. दरम्यान, शहरात चार महत्त्वाचे चौक असून त्यात छत्रपती शिवाजी महाराज चौक , डा. बाबासाहेब आंबेडकर चौक तसेच चिखली रोडवरील अहिल्यादेवी होळकर चौक हे मुख्य चौक असून शहरात कोणत्याही गावाकडून कोणत्याही रोडवर शहरात प्रवेश करायचा असल्यास या चौकातूनच जावे लागते. आज पर्यंत तीन-चार वर्षात पोलीस अधिकाऱ्यांच्या जाफराबाद पोलीस **(पान-३ वर)**

## मंठा बाजार समितीच्या वार्षिक सभेत मुख्यमंत्र्यांसह खा.जाधव व आ.लोणीकरांच्या अभिनंदनाचा ठराव

मंठा,दि.८(प्रतिनिधी) येथील कृषी उत्पन्न बाजार समिती मंठाची वार्षिक सर्वसाधारण सभा काल मंगळवार रोजी बाजार समितीच्या प्रांगणात सभापती ए.जे. बोराडे यांच्या अध्यक्षतेखाली व उपसभापती गोपाळराव बोराडे यांच्या उपस्थितीत पार पडली.सभेच्या सुरुवातीस लक्ष्मी मातेच्या प्रतिमेचे पूजन करून दीप



प्रज्वलन करण्यात आले. तदनंतर भारतीय कपास निगमच्या वतीने मागील पाच वर्षात सर्वाधिक कापूस भारतीय कपास निगम कडे विक्री करणाऱ्या **(पान-३ वर)**

## जालन्यात अवैध मद्यनिर्मिती, विक्री व वाहतुकीवर कारवाई

जालना,दि.८(जिमाका): राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या जालना पथकाने जिल्ह्यात अवैध मद्यनिर्मिती, विक्री तसेच वाहतुकीविरोधात विशेष मोहीम राबवून १२ गुन्हे दाखल केले असून, एकूण ६ लाख ६५ हजार १४९ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या आदेशानुसार राज्य उत्पादन शुल्क विभागाने दि. ६ ते ७ सप्टेंबर २०२६ दरम्यान ही कारवाई करण्यात आली. दोन



दिवसांच्या या मोहिमेत अवैध मद्यनिर्मिती, विक्री व वाहतुकीविरोधात विविध ठिकाणी छापे टाकण्यात आले. यामध्ये चापडगाव, घणसावंगी, माळी, पाळवाडी, परतूर, भोरखेडा, देवखेडा, भोकरदन, धोत्रेखेड, देवगाव, माहोरा, बदनापूर, कैकाडी मोहल्ला, वाडीवाडी तांडा, सावखेडा, हॉटेल साई दरबार, एमआयडीसी **(पान-३ वर)**

## दिव्यांग बांधवांना मॉड्युलर कृत्रिम हात-पायांचे वाटप आ. हिकमतदादा उढाण यांच्या पुढाकारातून उपक्रम

घनसावंगी,दि.८ (प्रतिनिधी) राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या ६२ व्या वाढदिवसानिमित्त शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष, डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन, आरोग्यदूत फाउंडेशन व रत्ना निधी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग बांधवांसाठी मॉड्युलर कृत्रिम हात-पाय वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शिवसेना जनसंपर्क कार्यालय, घनसावंगी येथे आयोजित या कार्यक्रमात पात्र दिव्यांग लाभार्थ्यांना मॉड्युलर कृत्रिम हात व पायांचे



वाटप करण्यात आले. आ. हिकमतदादा उढाण यांच्या पुढाकारातून तसेच सौ. मायाताई हिकमत उढाण यांच्या विशेष प्रयत्नातून हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. कृत्रिम हात-पाय मिळाल्यानंतर दिव्यांग लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधान व आनंद दिसून आला. या आधुनिक कृत्रिम अवयवामुळे दिव्यांग बांधवांना दैनंदिन जीवनातील विविध कामे अधिक सहजपणे करता येणार असून, त्यांच्या स्वावलंबनाला आणि आत्मविश्वासाला मोठी चालना मिळणार आहे. दिव्यांग बांधवांच्या आयुष्यात नवी उमेद, नवा आत्मविश्वास आणि स्वावलंबनाची नवी दिशा देणारा हा उपक्रम असून, समाजातील गरजू घटकांच्या पाठीशी उभे राहण्याची शिवसेनेची सामाजिक बांधिलकी यातून अधोरेखित झाली. त्यांच्या शारीरिक अडचणींवर मात करून सन्मानाने व **(पान-३ वर)**


Jamia Islamia Isha - atul Uloom's

**ISMAIL MEHTA COLLEGE OF PHARMACY**

324, Near Yashwanth Suth Girni, Ambad Dist.-Jalna (MS) 431204
Ph.: (02483) 275286, Fax: (02483) 275286. +91 7798898702, 8087748702
Visit us at: https://www.imcop.co.in/

**Recognized and Approved By:**
Govt. of Maharashtra, DTE, Mumbai, PCI-New Delhi, MSBTE Mumbai, Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere

**ADMISSION NOTIFICATION 2026-27**

D. PHARMACY | B. PHARMACY | D.S.Y. B. PHARMACY

Applications are invited from eligible candidates for **admission to D. Pharmacy First Year, B. Pharmacy First Year and Direct Second Year (Lateral Entry) B. Pharmacy** against **CAP vacant seats, if any, remaining after completion of the CAP admission process,** as per the rules and regulations applicable **for A.Y. 2026-27.**

| Sr. No. | Choice Code | Course | Program | Intake 2026-27 | Admission against CAP Vacant Seats (Minority Seat) | Admission against CAP Vacant Seats (Other than Minority Seat) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 261782310 | Degree | B. Pharmacy - First Year | 60 | if available after CAP | if available after CAP |
| 2 | 261782310 | Degree | B. Pharmacy - Direct Second Year (Lateral Entry) | 37 | if available after CAP | if available after CAP |
| 2 | 261782310 | Diploma | D. Pharmacy - First Year | 60 | if available after CAP | if available after CAP |

**Eligibility:** - Admission shall be subject to the eligibility criteria prescribed by the **Government of Maharashtra, Directorate of Technical Education (DTE)** and the **State CET Cell, Maharashtra,** as specified in the **Admission Brochure 2026-27,** along with other applicable rules and regulations.

**Admission Procedure:** Application forms are available at the College office. The detailed schedule, admission procedure, eligibility requirements and availability of vacant seats will be displayed on the **College Notice Board and College Website.**

**Note:** Admission against vacant seats shall be made strictly as per the applicable rules and only against seats available after the CAP process.

**# MI - Minority Institute | $ IL - Institute Level Seat**

Sd/-
PRINCIPAL
Ismail Mehta College of Pharmacy,
Ambad